आदिवासी आणि वनवासी.
संघ परिवार आदिवासी हा शब्द न वापरता वनवासी हा शब्द वापरतो. आदिवासी म्हणजे मूळचे रहिवासी.

1994 पासून संयुक्त राष्ट्रे 9 ऑगस्ट हा दिवस आदिवासी दिवस[1] म्हणून साजरा करतात.
जगभरात आदिवासींची ससेहोलपट होताना दिसते. ते गरीब, मागास, निरक्षर आणि अज्ञानी राहीले आहेत. आधुनिक विज्ञान, साहित्य, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, कायदे, न्यायालये, याच्याशी त्यांचा फारसा संबंध नाही. अमेरिकेतील रेड इंडियन्सना मारून आजची अमेरिका उभी राहीली आहे. आज अमेरिकेती एका राज्यात त्यांच्यासाठी काही जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. ब्राझील च्या अमेझॉनच्या खोऱ्यामध्ये आजही काही आदिवासी स्वतंत्र वस्ती करून राहत आहेत.

भारतातही आदिवासींना त्यांचे हक्क मिळणे मुश्कील झाले आहे. ते राहत असलेल्या भागात मोठ्या प्रमाणावर खनिज आणि जंगल संपत्ती आहे. ती मिळवण्याचा प्रयत्न करण्याऱ्या भांडवलदारांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या सरकारला त्यांना त्या जागांवरून हुसकून लावायचे असते. त्यांना योग्य नुकसानभरपाई देखिल मिळत नाही. ते संघटीत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आणि प्रभावी आंदोलने करू शकत नाहीत. न्यायालयाचा मार्ग त्यांना अधिकच अवघड वाटतो. दूरचित्रवाणी, रेडिओ, वर्तमानपत्रे ही माध्यमे मध्यमवर्गाच्या आणि भांडवलदारांच्या ताब्यात असल्यामुळे आदिवासींच्या प्रश्नांकडे फारसे लक्ष देत नाहीत.

काही स्वयंसेवी संस्था आणि आदिवासींमधील काही जागृत गट त्यांची बाजू घेऊन लढताना दिसतात. परंतू त्यांचा लढा फारसा प्रभावी नाही.

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जमातींना विशेष आरक्षण दिले आहे.
महाराष्ट्र विधानसभेमध्ये अनुसूचित जमातींसाठी 27 जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

1. Nandurbar ST लोकसभा
   - 1.1. Akkalkuwa (ST)
   - 1.2. Shahada (ST)
   - 1.3. Nandurbar (ST)
   - 1.4. Nawapur (ST)
   - 1.5. Sakri (ST)
   - 1.6. Shirpur (ST)

2. Gadchiroli-Chimur ST लोकसभा
   - 2.1. Amgaon (ST)
   - 2.2. Armori (ST)
   - 2.3. Gadchiroli (ST)
   - 2.4. Aheri (ST)
   - 2.5. Brahmapuri
   - 2.6. Chimur

3. Dindori ST लोकसभा
   - 3.1. Nandgaon
   - 3.2. Kalwan (ST)
   - 3.3. Chandvad
   - 3.4. Yevla
   - 3.5. Niphad
   - 3.6. Dindori (ST)

[1] http://www.un.org/en/events/indigenousday/

4. Palghar ST लोकसभा
   4.1. Dahanu (ST)
   4.2. Vikramgad (ST)
   4.3. Palghar (ST)
   4.4. Boisar (ST)
   4.5. Nalasopara
   4.6. Vasai

याशिवाय -

शिर्डी मतदारसंघातील

अकोले

हा विधानसभा मतदारसंघ आदिवासींसाठी राखीव आहे.

Bhiwandi Rural (ST)
Shahapur (ST)

असे एकूण 27 मतदारसंघ आदिवासींसाठी आरक्षित आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्र दाखविणारा नकाशा



रायगड, ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने आदिवासी जमाती आढळतात.

महाराष्ट्र शासनाचा स्वतंत्र आदिवासी विभाग आहे - https://tribal.maharashtra.gov.in/

महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमातींची यादी

http://www.mahashabri.com/ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ - महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

कॉंग्रेस पक्ष आपला निवडणुक प्रचार सहसा नंदुरबार या आदिवासी जिल्ह्यातून करतो.

भाजपने वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून आदिवासींमध्ये स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

साम्यवाद्यांनी ठाणे जिल्ह्यात व विदर्भामध्ये आदिवासींमध्ये आपले चांगलेच स्थान निर्माण केले आहे.

आदिवासी आणि नक्षलवादी.

भूमिसेना

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची लढाऊ संघटना. काळूराम धोदडे हे संस्थापक नेते.
आदिवासींनी हिंदू किंवा इतर कोणताही धर्म न मानता स्वतःची संस्कृती मानावी हा त्यांचा आग्रह
त्यांच्या कार्याबद्दल त्यांना 2001 मध्ये महाराष्ट्र फाऊंडेशनचा[2] पुरस्कार मिळाला.
पालघरातून काळूराम धोदडे रिडालोसचे उमेदवार - 2009 विधानसभा निवडणुका - जनता दल सेक्युलर तर्फे उभे-पराभूत. त्याजागी बहुजन विकास आघाडीचा उमेदवार निवडून आला. दुसऱ्या क्रमांकावर शिवसेनेचा उमेदवार

> *"रिपब्लिकन डावी लोकशाही समितीच्या वतीने जनता दल (से)चे उमेदवार म्हणून काळूराम काकडया धोदडे यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. जनता दलाचे पालघर तालुका अध्यक्ष ॲड. अमृत अधिकारी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही घोषणा केली आहे. समितीतर्फे झालेल्या जागावाटपात पालघर लोकसभा मतदारसंघांतर्गत बोईसर विधानसभा (राखीव) मतदारसंघ जनता दलाच्या वाटयास आलेला असून, या बोईसर विधानसभा मतदारसंघातून धोदडे ही निवडणूक लढविणार आहेत."*

काळूराम धोदडे गेली तीन दशकाहून अधिक काळ (साधारणपणे 1975 च्या आसपास) आदिवासी, दलित तसेच शेतकरी-शेतमजूर व वंचित समाजघटकासाठी अविरतपणे काम करीत आहेत. कुळ कायद्याअंतर्गत आदिवासींच्या जमिनी आदिवासींना मिळाव्यात यासाठी त्या काळात झालेल्या लढ्यातून भूमिसेनेचा जन्म झाला. तेव्हापासून ते भूमिसेनेचे नेतृत्व करीत आहेत. आदिवासी अस्मिता-संस्कृती- प्रशासन अशी नवी ओळख देणाऱ्या आदिवासी एकता परिषदेचेही ते गेली अनेक वर्षे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या या कामाची दखल राज्य व राष्ट्रीय पातळीवरही घेतली गेली. राज्य शासनाने 'आदिवासी सेवक' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला, तर प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र फौंडेशन' च्या 'समाज कार्यकर्ता' पुरस्काराचेही ते २००१ मध्ये मानकरी ठरले. 'बँक ऑफ महाराष्ट्र' च्या संचालकपदावरही त्यांनी काही वर्षे काम केले आहे.

पालघर मुख्यालयाला आदिवासींचा विरोध

ठाण्यातील आदिवासींना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी जिल्ह्याचे विभाजन करण्याचे ठरवले असून पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालय होणार आहे. मात्र…
ठाण्यातील आदिवासींना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी जिल्ह्याचे विभाजन करण्याचे ठरवले असून पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालय होणार आहे. मात्र, याला ठाणे, जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड येथील आदिवासींनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

[2] http://www.indiancharity.org/index.html

ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचा सर्वागीण विकास व्हावा, हा मूळ उद्देश घेऊन देशात सर्वात मोठा असलेल्या ठाणे जिल्ह्याचे एक मे रोजी विभाजन जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून जिल्ह्याचे मुख्यालय पालघर येथे करण्याचे योजले असल्याचे समजते. या मुख्यालयाला विरोध करण्यासाठी अनेक पक्ष संघटनांनी आपला तीव्र विरोध आंदोलनाच्या माध्यमातून वेळोवेळी दर्शवला आहे.

पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालय होणार असल्याने आदिवासी तालुक्यातून या ठिकाणाला मोठया प्रमाणात विरोध होताना दिसत आहे. पालघर मुख्यालयाला विरोध दर्शवण्यासाठी सर्वप्रथम राष्ट्रवादी वाडा तालुका शाखेने विरोध केला होता. त्यानंतर डहाणूमध्ये आदिवासी एकता परिषद व भूमी सेना यांनी मोर्चे काढून या मुख्यालयाला विरोध दर्शविला होता. तर पालघर मुख्यालयाला विरोध दर्शवण्यासाठी श्रमजीवी संघटनेने जव्हार येथे भव्य मोर्चा काढला होता.

जिल्हा विभाजन करण्याचा मूळ उद्देश आदिवासी बांधवांचा सर्वागीण विकास करणे आहे. हा मूळ उद्देश साध्य होण्यासाठी आदिवासी लोकसंख्या मोठया प्रमाणात असलेल्या त्याच विभागात जिल्ह्याचे मुख्यालय असायला हवे. तसेच ते सर्वाना मध्यवर्ती पडेल, असे असणे गरजेचे आहे. पालघर तालुक्यात रेल्वेची सुविधा आहे. तसेच कर्मचा-यांना ये-जा करण्यासाठी सोयीस्कर असल्याचे एकच कारण गृहीत धरून जर पालघर जिल्ह्याचे मुख्यालय केले तर भविष्यात वाडा, विक्रमगड, मनोर, जव्हार, मोखाडा यांसारख्या अतिदुर्गम तालुक्यात राहणा-या आदिवासी बांधवांवर मोठा अन्याय होईल. या अन्यायातून लोकांच्या भावनांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. या गोष्टींची काळजी सरकारने वेळीच घेतली पाहिजे. पुन्हा ग्रामीण आदिवासी भागांचा योग्य सर्व्हे करून भौगोलिकदृष्टया मध्यवर्ती असलेल्या ठिकाणीच जिल्ह्याचे मुख्यालय झाल्यास ख-या अर्थाने आदिवासी बांधवांचा सर्वागीण विकास होण्यास मदत होऊन, त्यांना योग्य न्याय मिळेल.

जिल्हा विभाजन होत असताना सरकारी अधिका-यांना किमान दोन महिने तरी आधी सूचना देणे गरजेचे आहे. मात्र, कोणतीही सूचना अधिका-यांना देण्यात आलेल्या नसल्याचे समजते. वाडा, विक्रमगड, मनोर, मोखाडा, जव्हार, खोडाळा येथील आदिवासी बांधवांनी वेळोवेळी पालघर मुख्यालयाला आपला विरोध दर्शवला आहे. हा विरोध डावलून सरकारने घाई-घाईने जिल्हा विभाजनाचा निर्णय घेतला तर मोठा अनर्थ होऊ शकतो. हे मुख्यालयाला विरोध करणा-या आंदोलनावरून सिद्ध होत आहे.

ख-या अर्थाने विभाजनाचा उद्देश सफल करायचा असेल तर जिल्ह्याचे मध्यतर्वी ठिकाण म्हणून सर्व आदिवासीबहुल तालुक्यांना वाडा हेच जिल्ह्याचे मुख्यालय योग्य आहे. वाडय़ातील पाली येथे मोठी सरकारी जागा आहे. येथेच पिंजाळ प्रकल्प असल्याने पाणीही मुबलक आहे. दळणवळणाच्या दृष्टीने दोन्ही बाजूने चौपदरी हायवे आहेत. तर भौगोलिकदृष्टया विचार केला तर सर्वाना मध्यवर्ती, असे ठिकाण आहे. सरकारने पालघर मुख्यालयाला होणारा विरोध लक्षात घेऊन मुख्यालयाचे ठिकाण हे मध्यवर्तीच करावे. अन्यथा जनतेचा मोठा उद्रेक होण्याची भीती आहे.

वाडा, विक्रमगड, मनोर, जव्हार, डहाणू, खोडाळा या ग्रामीण आदिवासी भागाचा ख-या अर्थाने विकास साधायचा असेल तर जिल्ह्याचे मुख्यालय हे मध्यवर्तीच असावे, यातच आदिवासींचा सर्वागीण विकास आहे.

आदिवासींचा विधानभवनावर मोर्चा
Mar 10, 2011, 01.57AM IST

वनहक्काच्या जमिनी नावावर करण्याची मागणी

म. टा. वृत्तसेवा । पालघर

वनहक्क कायद्याची अमलबजावणी योग्य पध्दतीने करण्यात यावी, या मागणीसाठी राज्यातील आदिवासी पायी चालत 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड जंगल अधिकार संघर्ष समिती'च्या नेतृत्वाखाली १५ मार्चला विधानभवनावर धडकणार आहेत.

नंदुबार, धुळे, अमरावती, नासिक, रायगड, ठाणे या जिल्ह्यांतील आदिवासी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आदिवासी एकता परिषद, सर्वहारा जन आंदोलन, श्रमिक क्रांती संघटना, भूमीसेना, कष्टकरी संघटना, जनता दल सेक्युलर, शेतमजूर संघटना, रिपब्लिकन पाटीर्, शेतकरी कामागार पक्ष, सीपीएम, समाजवादी पाटीर्, भाकप, लोक जनशक्ती पाटीर्, लालनिशाण गट आदी ४० संघटनांच्यावतीने हा धडक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

केंद सरकाने जंगल तसेच जंगल जमीनीवरील आदिवासी व बिगर आदिवासींच्या पिढ्यान पिढ्या कसत असलेल्या वहिवाटीचा हक्क मान्य करून त्यांची नोंद सरकारी सात बारा उताऱ्यावर करण्याचा कायदा २००६ साली मंजूर केला. मात्र या हक्कांची नोंद करण्यासाठी उपविभागीय पातळीवर २लाख ८८ हजार दाव्या पैकी केवळ १ लाख ०९ हजार दाव्यांनाच मान्यता मिळाली आहे. १लाख ०७ हजार दावे फेटाळण्यात आले आहेत, त्यांचा फेरविचार करण्याच्या मागणीसाठी हा मार्चा काढण्यात येणार आहे.

AYUSH | Re: Fw: Adiwasi Gaurav Din 9 Aug 2013
AYUSH Adivasi Yuva Shakti Sat, 10 Aug 2013 01:36:29 -0700
पालघरमध्ये आदिवासी सन्मान दिवस उत्साहात

पालघर : संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण आमसभेत पारित केलेल्या ठरावाप्रमाणे ९ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय आदिवासी सन्मान दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्व खेड्यापाड्यात तसेच डोंगरदर्या त राहत असलेल्या आदिवासी समूहापर्यंत पोहचविणे आवश्यक असल्याने हजारो संख्येने आज आदिवासी बांधवांनी आपली एकजुट दाखविली. यावेळी पालघर स्टेशन ते तहसील कार्यालयापर्यंत रॅली आयोजित करून पालघर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.
*आदिवासी संस्कृतीवर होणारे आक्रमण व मुख्य प्रवाहाच्या नावाखाली त्यांचे केले जाणारे सामिलीकरणामुळे आदिवासी संस्कृतीच धोक्यात आली आहे. निसर्गाशी त्यांचे वंशपरंपरेने चालत आलेले नाते संपुष्टात येत असून जागतिकीकरण व बाजारीकरणामुळे नैसर्गिक संपदा ओरबाडून नष्ट करून विकासाच्या नावाखाली आदिवासी समुहाचे बळी जात आहेत. मोठमोठी धरणे, खदाणी, खाणी, राष्ट्रीय महामार्ग, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यामुळे आतापर्यंत सर्वांत मोठय़ा प्रमाणात आदिवासी समुहाचे विस्थापन करण्यात आले आहे. याचे दुष्परिणाम आदिवासी समुहाच्या संस्कृतीवर, शिक्षणावर पडत आहे. नैसर्गिक संपदेची वारेमाप लुट राजरोसपणे सर्वत्र चालू आहे. भोगवादी संस्कृतीमुळे ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम संपूर्ण जगालाच धोक्यात आणू पहात असून उत्तराखंडमध्ये झालेला प्रलय हे निसर्गावर झालेल्या आक्रमणाचे खरे उदाहरण असल्याचे यावेळी सांगण्यात आले. *
भूमीसेना आदिवासी एकता परिषद आयोजित आजच्या कार्यक्रमात राज्यमंत्री राजेंद्र गावीत, जिल्हाध्यक्ष दत्ता करबट, निमंत्रक, काळुराम धोरडे, सुरेश हांडवा, तालुकाध्यक्ष अशोक ठाकरे, सचिव रामचंद्र सांबरे इ. मान्यवर उपस्थित होते.
यावेळी आद्यक्रांतीकारक बिरसा मुंडा यांचे स्मरण करून मशाल प्रज्वलीत करण्यात आली. यावेळी काळुराम धोदडे यांचा सत्कार करताना राज्यमंत्री म्हणाले की आदिवासी समाजातील संघर्ष हा आपल्या पाचवीलाच पुजला असून शासनाच्या आदिवासी

समाजाच्या विकासासाठी अनेक योजना असून त्या योजनांचा लाभ माझ्या आदिवासी बांधवांनी घ्यावा असे आवाहन शेवटी त्यांनी केले.(वार्ताहर)

*- मोठमोठी धरणे, खदाणी, खाणी, राष्ट्रीय महामार्गा, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यामुळे आतापर्यंत सर्वांत मोठय़ा प्रमाणात आदिवासी समूहाचे विस्थापन करण्यात आले आहे.
- आदिवासी समूहाच्या संस्कृतीवर शिक्षणावर परिणाम होत आहे. नैसर्गिक संपदेची वारेमाप लुट राजरोसपणे सर्वत्र चालू आहे. ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम संपूर्ण जगालाच धोक्यात आणू पहात असून नुकत्याच झालेल्या घटना हे त्याचेच उदाहरण असल्याचे सांगण्यात आले.*

म. टा. वृत्तसेवा । पालघर

स्वातंत्र्यानंतरच आदिवासींवर अधिक अत्याचार

इंग्रजांच्या राजवटीपेक्षा स्वातंत्र्यानंतरच आदिवासींवर अधिक अत्याचार झाल्याचा आरोप आदिवासी एकता परिषदेचे नेते व भूमिसेनेचे अध्यक्ष काळूराम धोदडे यांनी येथे बोलताना केला.

सहा दशकांपासून वनजमिनीवर आदिवासी गुजराण करीत आहेत मात्र अद्याप त्यांच्या नावावर प्लॉट नाहीत. कोर्ट कचेऱ्या करूनही न्याय मिळत नसल्याने आदिवासींनी येथील तहसिलदार कार्यालयावर गुरुवारी मोर्चा काढला होता. मोर्च्यात पालघर, वसई, वाडा, जव्हार, विक्रमगड व डहाणु. आदी भागातील आदिवासी मोठ्या संख्येने सामील झाले होते.

आदिवासींच्या विकासासाठी शंभर कोटी रुपये मंजूर केले जातात परंतु ९० कोटी रुपये मंत्री व अधिकारी यांच्या विमान प्रवासात तसेच खाणावळीत जातात प्रत्यक्षात आदिवासींसाठी काहीच उरत नाही असा आरोप धोदडे यांनी केला. यावेळी रामचंद गोवारी, दत्ताराम करबट, राजू पांढरा, जीवन शेलार आदींची भाषणे झाली. विविध मागण्यांचे निवेदन मोचेर्कऱ्यांनी नायब तहसिलदार अर्चना खंडागळे यांच्याकडे सादर केले. ठाणे जिल्ह्यात जमीन एकत्रिकरण प्रक्रियेत हडप केलेल्या जमिनी सव्हेर् करून आदिवासींना परत करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

स्वातंत्र्य आंदोलनातील आदिवासींच्या कार्याची नोंद नाही

नरेंद्र पाटील , पालघर
आदिवासी समाजातील अनेकांनी स्वातंत्र्य आंदोलनात तसेच देश उभारणीत आपला खूप मोठा सहभाग दिला मात्र तरीही देशातील एकाही पुस्तकात आदिवासींच्या इतिहासाची नोंद केली गेली नाही अशी खंत आदिवासी एकता परिषदेचे नेते व प्रसिध्द कवी वाहरू सोनावणे यांनी 'आदिवासी समाज जोडो अभियाना 'च्या समारोप प्रसंगी व्यक्त केली.
आदिवासी एकता परिषदेच्यावतीने ६ मेपासून ठाणे जिल्ह्यात 'आदिवासी समाज जोडो अभियान 'राबविण्यात आले त्याचा समारोप पालघर येथ करण्यात आला. अध्यक्षस्थांनी भूमिसेना नेते काळूराम धोदडे होते.

आदिवासी समाजात समानता बंधूभाव टिकून होता. समाजाचे शोषण होत नव्हते. जल , जंगल , जमिनीवर आदिवासींचेच हक्क होते. त्यामुळे कोणत्याही परवानग्यांची गरज लागत नव्हती. मात्र केंद्र सरकारने १८६५ मध्ये जंगलाचा कायदा आणला व लाकूड तोडण्यासाठीदेखील परवानगीची गरज लागू लागली आणि मग आदिवासी देशोधडीला लागला , असे सोनावणे यांनी स्पष्ट केले. आदिवासी समाज निसर्गाशी संबधित स्वत:च्या देवदेवतांना विसरला असून अन्य समाजाच्या देवदेवतांना नमन करू लागला आहे. अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. काळूराम धोदडे यांनी सांगितले की , आदिवासी एक झाला पाहिजे. आदिवासींचा राजकीय फायदा काही धूर्त राजकीय नेते मंडळी घेत असून ही मडळी समाजात नेहमी फूट पाडण्याचेच काम करत असते. ६४ वर्षे आदिवासींवर वेगवेगळया प्रकारे अन्याय केला जात असून सरकारची ही दादागिरी या पुढे खपवून घेतली जाणार नाही.
समारोपाच्या कार्यक्रमात दत्ता करबट , जीवन शेलार , मिना धोदडे , राजू पांढरा , अशोक चौधरी , गीता पागी ,डॉ. सुनिल पऱ्हाड प्रभृतींनी यावेळी आदींनी मार्गदर्शन केले.

सुसरी धरण विरोधी संघर्ष समिती

सुसरी नदीवर धरण होऊ देणार नाही, होवू देणार नाही
जाहीर सभा
ठिकाण कासा केंद्र दिनांक ९ ओक्ट २०११ रोजी सकाळी १० वाजता
सुसरी नदीवर नियोजित धरण प्रस्थावित आहे. या धारणा मुळे मौजे रानशेत, आवढाणी, महालक्ष्मी, धानिवरी , दहीगाव, ओसुर, असरविरा, नवनाथ आणि गनेशबाग (रानशेत) येथील आदिवासींच्या जमिनी व वनजमिनीचे सुमारे १००० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र पाण्याखाली येणार आहे. या धरणातील ५४ दश लक्ष घनमीटर पाणी पाईप लाईन द्वारे वसई, विरार व नवघर माणिकपूर व नालासोपाऱ्याला नेण्यात येणार आहे. या धरणाला आमचा प्रखर विरोध आहे. आजवर अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, भातसा सारख्या प्रकल्प द्वारा मुंबई ला पाणी नेण्यात येऊन ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील पाण्याची लुट करण्यात आलेली असून तेथील प्रकल्प ग्रास्तांचे पुनवर्सन झालेले नाही आणि आता मुंबई उपनगरे या भागात राहिलेल्या पाण्याची साधने हडप करू पाहत आहे. यातून आदिवासी साठी काहीही शिल्लक राहणार नाही.

म्हणूनच आतापर्यंत झाले इतके पुरे झाले, असे सरकारला ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. या पुढे आदिवासी नियोजनहित नागरीकरणाचा बोजा सहन करणार नाही. दूरवर आदिवासी भागात धरण बांधण्या एवजी वसई तालुक्यात असलेल्या पाण्याच्या स्त्रोताचा वापर करायला हवा. सिडकोने या साठी कामन, खोळ्सा पाडा, उसगाव, सातिवली, इत्यादी जागा सुचविल्या असून या ठिकाणच्या पाण्याच्या स्त्रोताचा वापर केला गेल्यास. दर दिवशी १२४ एम एल डी एव्हडे पाणी उपलब्ध होवू शकेल असे म्हटले आहे. सुसरी धरणात मिळणाऱ्या पाण्या पेक्षा हे मिळणारे पाणी किती तरी पटीने अधिक असेल या खेरीज पाईप लाईन तसेच बांधकाम खर्चाचीही बचत होवू शकेल. मात्र ठेकेदारांच्या लॉबीला बळी पडत सरकारने या सुचणे कडे दुर्लक्ष केले आहे. आमच्या भागातील काही राजकारणी लोकांनी आदिवासी कल्याणाचा विचार करण्या एवजी या धरणाचे समर्थन करत स्वतःची तुंबडी भरण्याच्या उद्देशाने मागे लागले आहेत.

आमच्या नद्याचे पाणी आमच्या मालकीचे आहे त्याच्या वापरावर आमचा अधिकार आहे आम्हालाच जर पिण्या साठी पाणी नाही तर आम्ही येथील पाणी वसई विरार ला का पाठवावे ? आणि त्यात तर शहराच्या मागण्या रोज वाढत आहेत. तसेच शहरी भागात दर माणसी पाण्याचा वापरही जास्त केला जातो. शहराच्या नवीन वसाहतींच्या गरजा भागवण्य साठी अधिका अधिक धरणे बांधली जातील. वसई विरार मधली बिल्डर लॉबीने चालविल्या नियोजनशून्य आणि अनिर्बंधित वाढीमुळे येथे पाण्याची कमतरता भासत राहणार आहे. सूर्या प्रकल्पाचे पाणी आदिवासींची शेती फुलाविन्या साठी दिले जाणार होते परंतु ठेकेदारांनी पद्धतशीर पणे वसई विरार सारख्या

योजना मधून हे पाणी अन्यत्र कसे वळवता येयील हे काम केले आहे. आदिवासी भागाचे वसाहतीकरण आणि त्यांचे पाणी इत्तर साधनांनी लुट या पुढे थांबवा असे सरकारला सांगण्यासाठी कासा येथे एकत्र जमायचे आहे.
सुसरी धरण विरोध संघर्ष समिती
अध्यक्ष : श्री नरेश हाल्या बोलाडा
उपधक्ष्य : श्री चंदू सोनू वरठा
सचिव : श्री देविदास नंदकुमार तल्हा
खजिनदार : श्री सुरेश बाबू कडू
सावळेंचे महत्त्वपूर्ण योगदान
(22-02-2014 : 00:56:22)

नाशिक : ब्राझील येथील पावलो फ्रेअरे या शिक्षणतज्ज्ञाच्या विचारांनी प्रभावित होऊन दत्ता सावळे यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग केले. यासह सामाजिक व परिवर्तनवादी चळवळींमध्ये त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांनी येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र सेवा मंडळाच्या वतीने दत्ता सावळे यांच्या स्मृतिनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विचार संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पळशीकर म्हणाले, दत्ता सावळे हे सामाजिक क्षेत्रातील अग्रगण्य कार्यकर्ते होते. समाजवादी विचारांच्या प्रचारासाठी १९४0 पासून त्यांनी आपले जीवन वाहून घेतले. प्रामुख्याने वारली आदिवासींच्या शिक्षणासाठी त्यांनी मोठे कार्य केले. भूमी सेना यासह देशभरातील विविध परिवर्तनवादी चळवळींमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे.

याप्रसंगी मोहन हिरालाल, डॉ. सतीश गुगुलवार, देवाजी तोफा, डॉ. उल्हास जाजू, राजन इंदुलकर, मुकुंद दीक्षित, संजय सावळे, अनिता बोरकर, नितीन परांजपे, अजित सावळे, सुजाता सावळे आदि उपस्थित होते. (प्रतिनिधी)

आदिवासी एकता परिषदेचे आवाहन

9 ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन म्हणून पाळण्यात येतो. त्यानिमित्ताने डहाणूत आदिवासींची स्टेशन ते प्रांत कार्यालय अशी भव्य रॅली काढण्यात येणार आहे. यावेळी मोठय़ा संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आदिवासी एकता परिषदेचे काळूराम धोदडे, श्यामसुंदर चौधरी भरत वायडा, डॉ. पहाड़, संघटक विराज गडग यांनी केले आहे. आदिवासी विकास प्रकल्पाकडूनही यानिमित्त आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप केला जाईल.

काळूराम धोदडे यांना आदिवासी सेवा पुरस्कार
जव्हार तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक रेवजीभाई चौधरी सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा आदिवासी सेवा पुरस्कार यावेळी ठाणे जिल्ह्यातील भूमीसेना व आदिवासी एकता परिषदेचे नेते काळूराम धोदडे यांना प्रतिष्ठानचे अध्यक्ष विष्णू रेवजी चौधरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन यावेळी त्यांचा गौरव करण्यात आला. रेवजीभाई चौधरी यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या खरवंद गावी आयोजित या पुरस्कार सोहळ्यात काळूराम धोदडे यांनी गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ अथकपणे आदिवासी समाजाला त्याची अस्मिता व मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी नि:स्वार्थपणे दिलेल्या योगदानाची यावेळी प्रशंसा करण्यात आली.